# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ६४४/२०२२

तक्रारकर्ता, परवेज अहमद सिध्दिकी
३०३ वैशाली अपार्टमेंट, सिटीझन स्कूल बाजुला
कोळीवाडा, वसई (प) ४०१ २०१

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
खजिना अव्वल कारकून, महसुल शाखा
तहसिल कार्यालय वसई, किल्लाबंदर रोड
मालोंडे गाव, वसई (प) ४०१ २०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
खजिना अव्वल कारकून, महसुल शाखा
तहसिल कार्यालय वसई, किल्लाबंदर रोड
मालोंडे गाव, वसई (प) ४०१ २०१

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १८/११/२०२१ | ७/१/२०२२ | २०/१२/२०२१ | १३/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२४/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " अपूर्ण माहिती दिली " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती उषा भोये, सहा.महसूल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.नितिन शिंदे, सहा.महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय वसई उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *दि.०१/१०/२०२० ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीत तहसिलदार यांनी पारित केलेल्या सर्व परिपत्रकांची प्रमाणीत प्रत मिळण्याबाबत व इतर माहिती.*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१३/१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, “ *जन माहिती अधिकारी तथा खजिना अव्वल कारकुन, तहसिलदार वसई यांनी या कार्यालयाकडे विषयांकीत उपलब्ध माहिती अपिलकर्त्यास १५ दिवसात विनामुल्य पुरवावी.*” असा निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी युक्तिवाद केला की, तक्रारदार यांना माहिती दिलेली असून तक्रार निकाली काढण्याबाबत त्यांनी दि.८/५/२०२५ रोजी पत्र दिले आहे.

तक्रारदार यांनी दि.८/५/२०२५ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे की, मला दि.८/५/२०२५ रोजी मागणी केलेल्या माहितीचे दफ्तर/अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिले त्यामधील आवश्यक असलेली माहिती मला विनामुल्य

उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामध्ये माझे समाधान झाले असून, आता माझी कोणतीही तक्रार नसल्याने सदर तक्रार निकाली काढणेस माझी हरकत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली असून, त्यांच्या विनंतीवरून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .